Dr. KRP 17-18

# 2017-18

Scanned with OKEN Scanner

# दुर्गा भागवत यांच्या ललित लेखनातील अल्पाक्षरत्त्व

डॉ किशोर आर पाठक
मराठी विभाग प्रमुख
पंकज कला महाविद्यालय,चोपडा
जि. जळगाव

आपल्या कसदार लेखनाने आणि व्यक्तिमत्त्वाने मराठी वाङ्मय आणि समाजमानस यांच्यावर आपला वैशिष्ट्यपूर्ण असा ठसा दुर्गा भागवत यांनी उमटवला आहे. त्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर लेखन केले आहे. ललित लेखनापासून तर लोकसाहित्यापर्यंत आपले लेखन विविध अंगानी केले आहे. त्यांच्या लेखनातून त्यांनी केलेली वर्णने ही प्रत्यक्षात आपल्या समोर ते दृष्य उभे केले जात आहे असे जाणवते. त्यांच्या सर्व लेखनाचा विचार न करता त्यांच्या केवळ ललितलेखनाचा विचार केला तर त्यांच्या ललितलेखनामध्ये आढळणारी वैशिष्ट्ये ही निश्चितपणे इतरांपेक्षा वेगळी आहे. ललितलेखनातून त्यांच्या लेखन शैलीची कल्पना ही चांगल्या प्रकारे येत असते. त्यांनी आपल्या लेखनात उत्तुंग प्रतिभा व प्रज्ञेचा वापर केला आहे, त्यामुळे जणू त्यांचे लेखन हे वेगळे ठरले आहे म्हणून त्यांच्या ऋतुचक्रा विषयी मीना वैशंपायन सांगतात, "दुर्गाबाईंचं 'ऋतुचक्र' म्हणजे मराठी ललितगद्य वाङ्मयातील मानाचं पान! निसर्गचक्राचं, निसर्ग व मानव यांच्या नात्याचं व त्यातील कालसातत्याचं त्यांचं भान अपूर्व आणि असाधारण आहे. हे आपण यापूर्वीच्या त्यांच्या निसर्गवर्णनपर लेखसंग्रहातून अनुभवलं आहे."

दुर्गा भागवत यांनी आपल्या लेखनातून विविध विषय हाताळले असले तरी त्यांनी वापरलेले शब्द हे समर्पक असे आहेत. ते शब्द वाचल्यावर त्याचे वेगळेपण वाचकांना कळत असते. असे अनेक समर्पक शब्द त्यांच्या ललितलेखनात जागोजागी दिसून येत असतात. त्यातून त्यांनी आपले लेखन वेगळे ठरवले आहे. व आपल्या लेखनातून त्यांनी अल्पाक्षरात्त्वाचा वापर केला आहे. याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो

'ऋतुचक्र' या लेखसंग्रहात त्यांनी सुरुवातीलाच ऋतुची केलेली व्याख्या ही खरोखरच समर्पक अशी वाटत असते किंवा ऋतु म्हणजे फिरता काळ ...... अशा प्रकारे आपल्या लेखनाला त्या सुरुवात करतात. चैत्र महिन्याचे वर्णन करतांना चैत्र हा खरा वसंतात्मा आहे, असे सांगतात. याच लेखात निसर्गाच्या दुनियेत कुठलेही भडक व एरवी विसंगत वाटणारे रंग विशोभनीय दिसत नाही, असे वर्णन येते. निसर्गाचे वर्णन करतांना सांगतात, "म्हणूनच निसर्गाच्या विराट चित्रलिपीचा शोध घेण्यापेक्षा मला या स्थूल, विरामचिन्हांकडेच पहायला जास्त आवडते." कावळा चिमणीचे वर्णन करतांना, 'कावळ्यांना अजुन पोरे झाली नसली तरी चिमण्यांच्या अंड्यांचा घास घेण्याचे डोहाळे ते पुरवून घेताहेत.' अशी वर्णने येतात.'चैत्रसखा वैशाख'मध्ये फुलमोगऱ्याची फुले पाहिल्यावर हारोहारी फुले लागणे हा शब्दप्रयोग केला आहे तसेच ती घटना आपल्या



Scanned with OKEN Scanner

समोर मांडली आहे. शेवग्याच्या शेंगांचे वर्णन करतांना अशाच अल्पाक्षरातून करतात व जास्त अर्थ सांगत असतात. देवबाभळीचे फुले फुलली की त्यांचा वास फर्लांगाफर्लांगावर पसरतो, असे देवबाभळीचे वर्णन येते. या फुलांच्या पाकळ्या सूर्यप्रकाशात खुलून दिसतात. भाद्रपदात तिळाचे फूल पाहिल्यावर 'लहान मूल फुरगटून वरचा ओठ बाहेर काढते तसे वाटते.' पौष महिन्यात झाडांवर पानाफुलांचे रंग स्पष्ट दिसतात, तर माघ महिन्यात पाने हे मातीच्या आधीन होतात यातून निसर्गाच्या पानगळतीतून मानवीजीवनातील मरण ही संकल्पना दाखवली आहे. तेव्हा त्यांना वाटते की, 'निसर्ग जितका उधळ्या आहे तितकाच कंजूष आहे.' या वर्णनातून कमी शब्दात भरपूर आशय व्यक्त केला आहे.

याच पुस्तकांत त्यांनी झाडांचे वर्णन करतांना 'तालबद्ध पौष' मध्ये काटेसावराच्या झाडावर फक्त फांद्या दिसतात, पण तरीही झाडांचा नूर रडवा दिसत नाही, असे त्यांना वाटते. तर पशुपक्ष्यांचे वर्णन करतांना चैत्र महिन्यात पक्ष्यांची घरटी बांधलेली पाहतांना दुर्गा भागवत यांना निसर्गाच्या विराट चित्रलिपीचा शोध घेण्यापेक्षा या स्थूल विरामचिन्हांकडे पाहायला त्यांना आवडते असे वर्णन त्या करतात. घारी जेव्हा कबुतराची अंडी पळवतात. विजातीय पक्ष्यांमधील भांडण कमी शब्दातून त्या वर्णन करतात. येथे त्यांनी पक्ष्यांची वर्णने कमी शब्दात केली आहेत. भाद्रपद महिन्यात कावळ्याची पिले उडण्याचे शिकतात तेव्हा त्याचे वर्णन करतांना 'कावळ्याच्या उड्डाण विद्येचा इतिहास दिल्याशिवाय भाद्रपद महिन्याची कहाणी जणू पूर्ण होत नाही' असे सांगतात. यातून त्या प्रत्येक महिन्यात काही विशिष्ट शब्द वापरतात. 'संध्यारंजित कार्तिक' मध्ये एका पाकोळीचे वर्णन करतांना, 'जननाचा देखावा नेहमी करूण भयावह आणि विस्मयजनक असतो,' अशा काही प्रभावी शब्दांचा वापर त्यांनी केला आहे. तर मांजरीच्या मागे पळणारा बोका पाहिल्यावर, 'नराला आपल्या मागे पळायला लावण्यात नारीजातीचा धूर्तपणा दिसतो.' स्त्री जातीचे पुरुषांवरील वर्चस्व कमी शब्दात दाखवले आहे. माघ महिन्यात पिंपळाचे नवीन आलेली गुलाबी पाने बघितल्यावर 'जणू काही सुंदर पुष्पाचे गेंदच या झाडावर फुलले आहेत', असे वाटते. मधुमालतीची वेल पाहिल्यावर 'मधुमालतीच्या वेलांनी पिंपळाला वेढलेले आहे' अशा वर्णनातून समर्पक व अल्पाक्षरत्व शब्द वापरून त्यांनी आपले लेखन केले आहे. त्यामुळे ते वाचनीय असे होते.

'भावमुद्रा' या लेखसंग्रहातही कमी शब्दांचा वापर करण्यात आला आहे त्यामुळे त्यांनी वापरलेल्या विशिष्ट शब्दातून त्या खूप मोठा अर्थ सांगून जातात. 'भावमुद्रेत' आलेल्या निसर्गवर्णनात त्यांनी कदंबाच्या झाडाचे वर्णन केले आहे. त्याच्या मनातील ही ओढ वर्णन करतांना, "पिशाच्च ठराविक जागेचा, ठराविक माणसाचा कानोसा घेते म्हणतात; तसाच तिने घेतला." यातून कदंबाविषयीची ओढ वर्णन करतात. पण शाळेच्या आवारातील हे कदंबाचे झाड तुटल्यावर त्यांना वाटते की, 'हा वडिलधारा मित्र नव्या



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 50 : Literature : New Trends and Tendencies
साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह साहित्य : नव प्रवृत्ति एवं प्रवाह
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018

जगात अडगळ वाटल्यामुळे खांडला गेला' असे सांगून त्यांना वाटणारे वृक्षप्रेम वर्णन केले आहे. 'श्रावणातील दुपार' मध्ये कावळ्यांच्या पिलांचे वर्णन करतांना ज्यावेळी एखाद्या पिलाला उडता येत नाही, तेव्हा इतर कावळे त्याला चोचा मारुन मारतात तेव्हा त्या सांगतात, 'लायक असेल त्यालाच जगू देण्याचा पाखरांचा कायदा मोठा कडक असतो.' यातून मानव जीवनातील 'बळी तो कानपिळी' हे तत्त्व जणू सांगतात. गुलमोहराच्या आठवणी सांगतांना, 'तांबड्या रंगाच्या असंख्य ज्योती ह्या झाडावर दिसतात' यातून या झाडावर आलेल्या फुलांचे वर्णन त्या करतात. अशा वर्णनातून त्यांनी कमी शब्दातून आपले लेखन प्रभावी केले आहे.

महमूदला वाटते की, 'बाई माणसं शिकली तरच पुरुष सुधारतील' यात स्त्री शिक्षणाची धडपड सांगितली आहे. याच लेखात सखु या झाडूवालीचे वर्णन येते. सखु आपल्या नातीचे लग्न करणार असते म्हणून ती म्हणते, 'एक चांगला पोर हेरुन ठेवला होता'. पण तिची इच्छा मात्र पूर्ण होत नाही. यात गरिबांच्या सर्वसामान्य इच्छा आकांक्षा पूर्ण होत नाही हे दाखवले आहे. 'व्रती' मध्ये दामुचे वर्णन करतांना असेच योग्य शब्द वापरले आहेत. 'मावशीचा नवरा हा लोकमान्य टिळकांचा परमभक्त होता' असे त्या वर्णन करतात. तर दामुविषयी सांगतांना, 'तिचा हात आणि दामुची पाठ' असे वर्णन येते. येथे ती घटना आपल्यापुढे उभी केली आहे. 'पाहुणी' या लेखातील इंदिराबाई, 'मांजरीप्रमाणे स्वतःच्या देहाचे सौष्ठव व स्वास्थ्य मिळेल तिथे शक्य तो आराम घेण्याचे ठाम धोरण ... ' येथे आपल्या जीवनाचे उद्दिष्ट त्या कमी शब्दातून सांगतात. या इंदिराबाई आपलं तत्त्वज्ञान सांगतांना, 'मुलांना बाळसं तसं विधवांना येते बरंका? रांडमांस म्हणतात त्याला' या वर्णनातून इंदिराबाईंनी आपल्या जीवन जगण्याची विशिष्ट अशी पद्धत सांगतांना कमी शब्दांचा वापर करून भरपूर काही सांगितले आहे.

'बाहुली' मध्ये मंजू पंडितचे वर्णन येते. हीच मंजू जेव्हा आपल्या संसाराविषयी सांगते तेव्हा, 'नोकरी सहा महिन्याची आहे आणि संसार अळवावरच्या पाण्यासारखा' यात तिच्या संसाराचे खरे वर्णन आले आहे. पुंजा या झाडुवाल्याचे वर्णन करतांना शेवटी काठेवाडी स्त्री सांगते, 'बाई त्याला कोण विसरेल, तो वेगळाच होता, वह तो राजा था' असे सांगते. येथे पुंजाविषयीचे विचार आले आहेत. 'वात्सल्याचा आविष्कार' मध्ये विंचवाची मादी विंचवाला मारते हे पाहून, 'क्रौर्य आणि माधुर्य यांचा संगम विंचवात त्यांना दिसतो असतो.' अशा वर्णनातून त्यांनी विंचवाच्या प्रणयाचे वर्णन केले आहे. विंचवाचे खरे प्रेम अल्पाक्षरातून वर्णन केले आहे.

'व्यासपर्वात' श्रीकृष्णाचे वर्णन करतांना 'पूर्णपुरुष श्रीकृष्ण' असे केले आहे. म्हणून कृष्ण हा दैवी व्यक्ती म्हणून त्याला कोणतांच आकार न मिळता प्रत्येकाच्या मनात जसा श्रीकृष्ण असेल तसा त्याला दिसला आहे. तसेच श्रीकृष्णाविषयी सांगतांना,



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 50 : Literature : New Trends and Tendencies
साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह साहित्य : नव प्रवृत्ति एवं प्रवाह
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018

'श्रीकृष्ण वा॒याच्या झोताप्रमाणे आपले जीवन जगतो तो कोणतेही काम जीव ओतून करतो.' यातून श्रीकृष्णाचे गुण दाखवले आहेत असा कृष्ण वाचकांसमोर उभा केला आहे. 'मोहरीतली ठिणगी' मध्ये द्रोणाचे वर्णन येते. 'बुद्धीकौशल्य सा॒यांचे नियोजन द्रोणाने एकलव्याचा अंगठा कापून घेतला तेव्हापासून सुरू झाले' असे सांगून द्रोणाचार्याविषयी लेखन केले आहे. याच लेखात बुद्धीवान लोकांचे वर्णन करतांना 'विद्यावंतांची बधीरता हा संस्कृतीला लाभलेला शाप आहे' असे सांगतात यात प्रखर टीका करतांना देखील त्यांनी अल्पाक्षरत्त्व साधलं आहे. युद्धिष्ठिराने युद्धात 'नरोवा कुंजरोवा' किंवा 'मोहरीतली ठिणगी' असे खास शब्द वापरले आहेत. दुर्योधन त्यांना 'व्यक्तिरेखा हरवलेल्या माणसासारखा' दिसतो. म्हणून दुर्योधनाचे वर्णन करतांना 'त्याला सत्याची पारख असली तरी त्याची बुद्धी सूक्ष्म नव्हती' असे वर्णन येते. येथे त्याचे वास्तव स्वरूप साकारतांना त्यांनी प्रभावी शब्दांचा वापर केला पण तो कमी शब्दातून बरेच काही सांगतो. अशा प्रकारे दुर्गा भागवत भाषेचा चपखल वापर करतात.

'एकाकी' मध्ये कर्णाचे वर्णन येते. कर्णाने वै॒यांना दान दिले ते भरल्या मनाने असे त्या सांगतात. हाच कर्ण जेव्हा कुंतीला सांगतो, 'मला टाकले ते तू बरे केले नाहीस' यात आहे त्या परिस्थितीला तो सामोरा जातो व कमी बोलतो. कर्णासाठी 'अर्धरथी' हा शब्द देखील वापरला आहे. 'परीकथेतील नायक' म्हणून अर्जुनाचा उल्लेख करतात. दुर्गा भागवत सांगतात, 'परीकथेच्या हळूवार वेचक तेवढ्याच कला घेऊन व्यासाने आपल्या कथावस्तुला परीकथेच्या जाचातून मुक्त ठेवले आहे.' अर्जूनाला परिकथेतील नायकाचे स्वरूप देवून उभे केले आहे. 'मुक्तपथिक' असे युधिष्ठिराला म्हटले आहे. या युधिष्ठिराला पूर्णत्वाची तहान लागली होती असे त्या सांगतात. हा युधिष्ठिर जन्मभर जनात असूनही एकाकीच राहिला. 'अश्रू हरवल्यावर' असे वर्णन पितामह भीष्मांचे केले आहे. याच भीष्माविषयी सांगतांना, 'भीष्माबद्दल सर्वांना आदर होता पण दरारा कुणालाच नाही' तर शेवटी सांगतात भीष्माला काय मिळाले? तर गर्भपात होऊनही न रडण्याचे वरदान. या अशा वर्णनातून त्यांनी भीष्माचे वर्णन हे वास्तव असे केले आहे. ते वाचतांना त्यातील शब्दयोजनाही अतिशय प्रभावी आहे हे जाणवते. 'कामिनी' असे द्रौपदीला म्हटले आहे. याच द्रौपदीविषयी सांगतांना 'तिचा जन्म भोगासाठी नसून जाळण्यासाठी झालेला आहे' असे वर्णन येते. यातून कमी शब्दातून द्रौपदीविषयी जास्त सांगुन त्यांनी तिचे खरे स्वरूप वर्णन केले आहे.

'रूपरंग' मध्ये व्यक्तिवर्णने आलेली आहेत. त्यात काही पुरुषांची तर काही स्त्रियांची आहेत. पुरुष व्यक्तिवर्णनात 'मास्तर' मुलांना बोलतांना 'नुसते खायला काळ आहेत' असे सांगतात. मुलांना जेव्हा संस्कृत येत नाही तेव्हा ते म्हणतात, या मास्तरांचे महत्त्व कळल्यावर, 'भाषेच्या पोटी क्रांतीचे अंडे उगवलेले मी पाहिले' असे सांगतात.



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013) | March 2018
Special Issue 50 : Literature : New Trends and Tendencies
साहित्य : नवीन प्रवृत्ती आणि प्रवाह साहित्य : नव प्रवृत्ति एवं प्रवाह
UGC Approved No. 40705 & 44117

'शीवचा म्हातारा' यात म्हाताऱ्याच्या डोळ्यांचे वर्णन करतांना डोळे 'शिकाकाईच्या बियांसारखे बारीक' असे वर्णन करून वास्तव परिस्थिती वाचकांसमोर दाखवतात. 'वृत्तहार' मध्ये बंडू कदमाचे वर्णन येते. बंडूला अफवा पसरवायला आवडतात तेव्हा तो म्हणतो, 'आण्णा काही खरं नाही, आंधळं दळतं नि कुत्रं पीठ खाते.' यातून बंडू हा जास्तीत जास्त दुसऱ्याविषयी अफवा पसरवताना कमी शब्दांचा वापर करतो हे दिसते. या वर्णनातुन त्यांनी ती पात्रे वाचकांसमोर मांडतांना कमी शब्दातून उभी केली आहेत.

स्त्री व्यक्तिरेखामध्ये 'न जन्मलेला' यात गंगाचे वर्णन येते. गंगाला दुसरे लग्न करण्याचे सांगितल्यावर ती नकार देते. गंगाची मुलगी तिच्याकडे जायला नको म्हणून गजराचा नवरा सांगतो, 'आईकडे गेलीस तर तंगडं मोडेन' अशी भाषा वापरतो. 'परिवार' मध्ये आलुला कुत्र्याविषयी प्रेम असल्याने, 'या देशातल्या माणसांनाही मॅनर्स नाहीत आणि कुत्र्यांना पण' असे सांगते. डॉक्टर जेव्हा कुत्र्यांकडे लक्ष देत नाही तेव्हा पैसा पाहिजे त्यांना कर्तव्य नाही, दया नाही असे आलु सांगते. येथे कमी शब्द वापरून कुत्र्याविषयीचे प्रेम व्यक्त केले आहे. 'सवाष्ण' मध्ये आपली मैत्रीण रविबालाचे वर्णन आले आहे. रविबाला ही आहे त्या परिस्थितीत समाधानी राहते. तेव्हा त्यांना वाटते की, 'हक्काची सवाष्ण आल्याने घर उजळले' जेव्हा नवे लुगडे नसते पण ती आपली समजूत करतांना सांगते, 'मुलं लहान असतांना नवी लुगडी कशाला हवीत?' यातून आहे त्यात समाधान मानण्याची तिची प्रवृत्ती दिसते व त्या स्त्रीचे वर्णन करतांना त्यांनी तिचे वर्णन वास्तव रितीने केले आहे. 'निदिध्यास' मध्ये काशीबाईनी आपले तत्त्वज्ञान ठरवले होते. म्हणून त्या सांगतात, 'बाईमाणसानं एकटं जाऊ नये कुठं असं आमचं शास्त्र आहे हो पण तुमचं जग वेगळं....'. सोनापुरात साडी नेसून जाण्याची त्यांची ती इच्छा पूर्ण होत नाही. तेव्हा तिची भाची सांगते की, 'पाच हात कापड पण आमच्या आत्याला दुर्लभ झाला हो ..... ' यातून विधवांची स्थिती दाखवली आहे व कमी शब्द वापरुन विधवांचे प्रश्न समाजासमोर मांडले आहेत. अशाप्रकारे शब्दांचा यथोचित वापर करून त्यांनी आपले लेखन केले आहे. त्यातून अनेक ठिकाणी चपखल अशा भाषेचा वापर केला व आपली वर्णने ही जिवंत व प्रवाही केली आहेत.

**संदर्भ ग्रंथ**

१)वैशंपायन मीना,संपा. 'भावसंचित दुर्गा भागवत', शब्द प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २०१५,
२)भागवत दुर्गा, 'ऋतुचक्र', पॉप्युलर प्रकाशन, चौथी आवृत्ती, १९७३,
३)भागवत दुर्गा, 'भावमुद्रा', मौज प्रकाशन गृह, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९७५,
४)भागवत दुर्गा, 'व्यासपर्व',मौज प्रकाशन गृह, मुंबई, सहावी आवृत्ती,१९९६
५)भागवत दुर्गा, 'रूपरंग', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९६७,
६)भागवत दुर्गा, 'पैस', मौज प्रकाशन गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती १९७३,

49

# एसईझेड (सेझ) कादंबरीतील सुशिक्षित बेरोजगारांच्या व्यथा

प्रा. डॉ किशोर आर. पाठक
मराठी विभाग प्रमुख,
पकंज महाविद्यालय,चोपडा, जि. जळगांव

************

मराठी साहित्यात कादंबरी या साहित्य प्रकारात विपुल असे लेखन झाले आहे. अनेक विषयांवर लेखन करुन समाजातील विविध समस्या, प्रश्न यांचे वास्तव असे चित्रण मराठी कादंबरीने केले आहे. इ.स. २००० पर्यंतच्या कादंबऱ्यांतुन असे अनेक विषय हाताळले गेले. त्यातून खेडे व ग्रामीण जीवन, ग्रामीण समाज यांचे वर्णन करुन त्यांच्या जाणीवा अचूक वेधण्याचे काम होतांना दिसते. असे असले तरी २००७ मध्ये शंकर सखाराम यांची घ्संझड ही कादंबरी ग्रामीण जीवनाचा वास्तव वेध घेतांना दिसते. एसईझेड म्हणजे Special Economic Zone (विशेष आर्थिक क्षेत्र) होय. भारता सारख्या देशाचा विकास होण्यासाठी ही योजना आणली गेली. परंतु त्यामुळे ग्रामसंस्कृती उध्वस्त होतांना दिसते. जागतिकीकरणामुळे कोकणासारख्या भूभागाचे स्वरुप हे मोठ्या प्रमाणात बदलतांना दिसत असते. सेझ कादंबरी विषयी प्रा. अनंत देशमुख लिहतात, "प्रा. शंकर सखाराम यांच्या कादंबरी लेखनाने मराठी प्रादेशिक कादंबरीचे एक सशक्त दालन खुले केले आहे. असे म्हणता येते."१ या कादंबरीत सुशिक्षीत बेकारांच्या व्यथा पुढीलप्रमाणे मांडलेल्या आहेत.

सेझ कादंबरीत चंद्रकांत थळे हा सुशिक्षित बेरोजगार आहे. कादंबरीची सुरुवात ही त्याच्या घरातूनच होत असते. तो शिकलेला आहे पण नोकरी लागत नाही त्यामुळे तो व रघु एकमेकांशी गप्पा मारतात त्यावेळी चंदू सांगतो की, "मी आज एम्प्लॉयमेंट ऑफीसात जाऊन आलो. नाव नोंदवून अर्धे वर्ष झाले. पण ना एक कॉल ना काय."२ अशा प्रकारे चंदू हा नोकरीची वाट पाहतो पण त्याला नोकरी मिळत नाही. शेवटी मुंबईला जावून नोकरी करावी. मुंबई आपल्याला वरदान असे चंदूला वाटते पण तिथे आपला वशिला नाही म्हणून आपल्याला नोकरी नाही असे रघु त्याला सांगतो. येथे उच्चशिक्षित तरुणाने नोकरी मिळवण्यासाठी कितीही प्रयत्न केलेत पण त्याचा कोणताही वशिला नसेल तर नोकरी मिळणे हे दुरापास्त होते याची जाणीव या कादंबरीतून येत असते. तसेच नोकरी मिळत नाही म्हणून चंदूने कॉम्प्युटर कोर्स केला पण घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे घरी कॉम्प्युटर घेणे शक्य नसते तेव्हा त्याच्या मनात शंका येवून तो त्याच्या भोटाकडे पाहून विचार करतो की, आपण ने सर्व विसरत आहोत. त्यातून ग्रामीण भागातील उच्च शिक्षित तरुणांच्या व्यथा या चंदूच्या रुपाने कादंबरीकाराने मांडल्या आहेत.

नोकरी मिळवण्यासाठी चंदू व रघु दोघे विचार करतात व नोकरी मिळवण्यासाठी पैसा हा कसा आवश्यक आहे यावर दोघे बोलतात तेव्हा चंदू बोलतो, "सगळा नोटांचा खेळ रे तिथ आपण कमी पडतोय." यातून हातात पैसे नाही त्यामुळे त्यांना नोकरी मिळत नाही याचे चित्रण कादंबरीकाराने केले आहे. नोकरी मिळत नाही म्हणून चंदू कल्पना करतो की, आपल्याकडे दोन बकऱ्या व दोन कराडे आहेत. आणखी दोन बकऱ्या घेतल्या तर बकऱ्यांचा कळप उभा करु त्या विकुन आपण आपला खर्च भागवू. यातून आहे त्या परिस्थितीत या कादंबरीतला चंदू हा आपला उदरनिर्वाह करण्याचे ठरवत असतो. चंदूच्या वडिलांना वाटते की, आपल्या मुलाला नोकरी मिळत नाही त्यावेळी चंदूला वाटते की. "मी एकटाच बेकार आहे ... घरोघरी किती सुशिक्षित बेकार पडलेत ... "३ यानंतर चंदू बकऱ्या चारण्यासाठी घरातून बाहेर जातो. त्यावेळी जिल्हा परिषदेत नोकरीस लागलेला विष्णु त्याला दिसतो. नोकरी नसल्याने तो त्याला दिसतो. नोकरी नसल्याने तो त्याला झेडपी मध्ये जागा भरणार आहे का? हे विचारतो पण तेव्हा विष्णुने त्याला कोणत्या पक्षाचे काम करतो हे विचारले यातून बुद्धीपेक्षा राजकीय वरदहस्त असला तर नोकरी सहज लागते व या बाबतीत चंदू हा अनभिज्ञ होता. नोकरी नसल्याने त्याला अनेक लोक अनेक सल्ले देतात. त्यातच त्याने पोलीस व्हावे असे श्यामा त्याला सांगतो. पण तेव्हा शारीरिक क्षमता मत्विाची नसून आर्थिक क्षमता ही महत्त्वाची आहे हे चंदू त्याला सांगतो. त्यावेळी चंदूला वाटते की, आपण गावात शिकवणी घ्यावी पण त्याचा इतिहास व मराठी विषय असतो. आपल्याकडे कोण शिकवणीला येणार हा प्रश्न त्याला पडतो. त्यात त्याला वाटते की, एम. ए. बी.एड. करावे पण आपण काहीही करु शकत नाही कारण आपल्याकडे पैसा नाही. आहे त्या परिस्थितीत संघर्ष करून चंदू आपले जीवन जगण्याचा प्रयत्न करत असतो.

चंदू जेव्हा झोपतो तेव्हा त्याला स्वप्न सुद्धा नोकरीचेच पडतात. एके दिवशी तो मोठ्याने बडबडतो गेली गेली नोकरी गेली तेव्हा त्याची आई त्याला जागे करते व तुला नोकरीचे स्वप्न पडते हे सांगतो पण तू नोकरी ऐवजी शेती कर असे सांगते. नंतर जिल्हा परिषदेत तो नोकरीसाठी प्रयत्न करतो पण ती मिळत नाही. त्यातच नोकरी नाही म्हणून त्याला सुशिक्षित बेराजगार भत्त्यासाठी एम्प्लॉयमेंट मध्ये अर्ज कर असे सांगितले पण आता तीही योजना सरकारने बंद केली असे तो सांगतो. त्यातही या भत्ता वाटपात कसा भ्रष्टाचार होत असतो



Scanned with OKEN Scanner

यावर तो अशोकला सांगत असतो व या सर्वांतून काय घडून येते तर सुशिक्षित तरुणांची छळवणुक ही मोठ्या प्रमाणात होत असते व ती कोणीही थांबवू शकत नाही याची जाणीव चंदूला होत असते.

चंदूला शेवटी बेकार म्हणून जगणे नशीबी येते. त्यात हा तो एक उमदा तरुण आहे तेव्हा गावातील गुरुजी त्याला पोल्ट्री फार्म काढण्याचे सांगतात व पोल्ट्रीच्या प्रशिक्षणासाठी त्याला पाठवत असतात. गावातील गजानन गुरुजींनी मार्गदर्शन केल्याने चंदू या व्यवसायात आपली चांगली पकड बसवायला सुरुवात करतो. कोंबड्याच्या पिलांची चांगली काळजी घेतो. त्यातही आहे त्या परिस्थितीशी संघर्ष करत तो आपले काम चांगल्याप्रकारे करत असतो. त्याच्या हातात चार पैसे येतात. बहिणीचे लग्न त्याने चांगले केले पण शेवटी त्याच्या या व्यवसायात बर्ड फ्ल्यु ची साथ येते. त्यावेळी चंदू आपल्या हाताने कोंबड्या मारुन टाकतो. चंदूची अवस्था ही विदारक होते. नोकरी नाही, पोल्ट्री बंद यात काय करावे हा त्याला प्रश्न पडतो. या कादंबरीत शिकुन नोकरी नाही तेव्हा स्वतःचा व्यवसाय करून आपले जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या चंदूची निराशा कशी होते याचे वास्तव असे वर्णन यात केले आहे. या कादंबरी विषयी अशोक लोटणकर लिहतात, "गावागावांतील सुशिक्षित बेकार, त्यांची नोकरीसाठी चालु असलेली धडपड, वणवण फिरुन पदरी पडणारी निराशा, नोकरी न मिळाल्यामुळे छोटा - मोठा उद्योग सुरु करण्याकडे गेलेला कल इ. चे दर्शन कादंबरीत होतेच. शिवाय शासकीय यंत्रणा भ्रष्टाचारामध्ये किती बरबटलेली आहे, याची अनेक उदाहरणे सापडतात. झेडपीतील राजकारण, पोलीस भरतीसाठी ४० ते ५० हजार, एम्प्लॉयमेंट एक्सचेंज मधला भ्रष्टाचार, बेकारी भत्ता खाणारे क्लर्क, शाळा बदलीसाठी शिक्षण अधिकाऱ्याला १५-२० हजार द्यावे लागणे, तलाठी कोतवाल, इ. वर्तणुक इ. इ. बाबींवर लेखकाने प्रकाशझोत टाकला असून भ्रष्टाचारामुळे देखील जनतेची किती छळवणुक होतेय हे स्पष्ट केले आहे."४ थोडक्यात शंकर सखाराम यांनी सेझ कादंबरीतून सुशिक्षित बेरोजगाराच्या व्यथा समाजासमोर मांडून त्यांच्या दुःखाची जाणीव वाचकांना करुन दिली आहे. उच्च शिक्षित होवून ही नशीबी बेकार म्हणून फिरणे हे कायमस्वरुपी कसे येते याचे वर्णन या कादंबरीत आले आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) गुरव धनाजी, एसईझेड (सेझ) कादंबरी एक शोध, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर, पहिली आवृत्ती, २००८ पृष्ठ क्र. १६

२) शंकर सखाराम, एसईझेड, सामंत पब्लिकेशन, मुंबई, प्रथमावृत्ती, ९ सप्टेंबर २००७, पृष्ठ क्र. ३

३) तत्रैव - पृष्ठ क्र. ६

४) गुरव धनाजी, एसईझेड (सेझ) कादंबरी एक शोध, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर, प्रथमावृत्ती, २००८, पृष्ठ क्र. २९-३०

50

# भारतात बदल घडविणाऱ्या उच्च शिक्षणाची आवश्यकता

प्रा. डॉ. संजय जिभाऊ पाटील
इतिहास विभाग ,
क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय,
नवलनगर,ता.जि.धुळे.

**********

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून आता अनेक दशके लोटली आहेत.भारतीय शिक्षण क्षेत्रात कालांतराने अमुलाग्र बदल घडून आलेले आहेत जसे बदल घडून आले आहेत तसे अनेक गंभीर प्रश्नही निर्माण झाले आहेत.सद्य स्थितीत तर शिक्षण व्यवस्थेत आणि विद्यार्थ्यांच्या मानसिकतेतही झपाट्याने बदल घडून येतांना दिसत आहेत.पालक वर्गाच्या अपेक्षा उंचावलेल्या दिसतात.प्रामुख्याने शिक्षणाचा संबंध नोकरीशी लावला जातो.याच पार्श्वभूमीवर समाज हा उच्च शिक्षित व सुसंस्कृत असणे आवश्यक आहे.त्याच बरोबर विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास,रोजगार निर्मिती कौशल्य,राष्ट्रीय मुल्यांचे संवर्धन घडवून बलशाली युवक व बलशाली भारत घडविण्याचे आव्हान आजचे उच्च शिक्षण पेलू शकते का? या प्रश्नाचा अध्यापक, प्राध्यापक,प्राचार्य,संस्थाचालक,शिक्षणतज्ज्ञ व शासन या सर्वांनी गांभियाने विचार करणे गरजेचे आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेचा मुलाधार असलेला स्वातंत्र्य,समता आणि बंधुता याची जागा उदारीकरण,खाजगी करण आणि जागतिकीकरण व्यापत आहे."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या बाबतीत म्हटले आहे की, "उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होवून अल्पायुषी होतो मात्र शिक्षणाच्या अभावी माणूस निर्बुद्ध राहिल्यास तो जीवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो."यावरुन माणसास शिक्षण किती आवश्यक आहे हे लक्षात येते.प्रस्तुत शोध निबंधातून उच्च शिक्षणाचा अर्थ ,भारतीय शिक्षणाचा इतिहास ,स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचे उच्च शिक्षण भारत व परदेशातील उच्च शिक्षणातील तुलना भारतीय उच्च शिक्षणापुढील प्रश्न आधुनिक शिक्षणाची गरज ,बदल घडविण्याचा शिक्षण पद्धतीचा स्विकार इ.वर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.



Scanned with OKEN Scanner

# कवी अशोक कोतवाल यांच्या नुसताच गलबला या काव्य संग्रहातून जागतिकीकरणाचे वर्णन

– डॉ. किशोर आर. पाठक
मराठी विभाग प्रमुख, पंकज कला महाविद्यालय
चोपडा, जि. जळगाव

खानदेशात अनेक साहित्य प्रवाहात लेखन झाले आहे. त्यात काव्यात देखील अनेकांनी आपले योगदान दिले आहे. आपल्या लेखनाने कवींनी समाजाचे वास्तव असे वर्णन केले आहे. थोडक्यात खानदेशातील काव्य परंपरेचा आढावा घेतला तर असे जाणवते की, समृद्ध असे लेखन येथे अनेक कवींनी केले आहे. यात ना.धो.महानोर,गणेश कुडे, वि.भा.नेमाडे, विद्याधर वैद्य, नारायण शिरसाळे, पुरुषोत्तम पाटील, प्रकाश किनगावकर, अशोक कोतवाल, त्र्यंबक सपकाळे, वाहरु सोनवणे, फुला बागुल; जगदीश देवपुरकर इ. अनेक कवींनी काव्य लेखन करुन खानदेशी काव्यचे लेण सजवले आहे.या कवीमध्ये अशोक कोतवाल हे एक महत्तवाचे कवी आहेत. त्यांनी आपल्या लेखनातून प्रामुख्याने महानगरीय जाणिवा, जागतिकीकरणाने समाजात होणारे बदल त्यामूळे कुटूंब संस्थेत होणारा बदल याचे अतिशय बारकाईने वर्णन आपल्या नुसताच गलबला या काव्य संग्रहातून केले आहे.

अशोक कोतवाल यांनी आपल्या या काव्य संग्रहातून शहरी भागात राहणाऱ्या मध्यमवर्गीय लोकांच्या विविध समस्यांचे वर्णन केले आहे. त्यातही जागतिकीकरणाने या सर्वसामान्य लोकांच्या जीवनवर होणारा परिणाम ते आपल्या लेखनातूनं अतिशय प्रभावीपणे वर्णन करत असतात. तसेच जागतिकीकरणामुळे बदलत जाणाऱ्या मानवी समाजाचे ते चपखल असे वर्णन आपल्या लेखनातून करत असतात. या जागतिकीकरणाने मानवी जीवनात स्वकेन्द्री जीवनाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यामुळे माणूस हा फक्त आपल्या पूरता विचार करतो . त्याला आपल्या आजूबाजूला पाहण्यास किंवा विचार करण्यास वेळ राहत नाही. याचे योग्य असें दर्शन कवी अशोक कोतवाल आपल्या नुसताच गलबला यात वर्णन करत आहेत. कवी अशोक कोतवाल आपल्या लेखनातून समाजात होणाऱ्या मूल्य ऱ्हासाचे वर्णन करत असतात. जागतिकीकरणामूळे समाज जीवन कसे बदलत आहे ते यातून दाखवत आहेत. थोडक्यात अशोक कोतवाल यांनी आपल्या काव्य लेखनातून समाजात होणाऱ्या बदलाचे अतिशय सुक्ष्म असे वर्णन केले आहे.

कवी अशोक कोतवाल यांनी आपल्या लेखंनातून विविध विषयांवर लेखन करुन समाजातिल विविध समस्या या आपल्या लेखनाने समाजा समोर मांडत असतात. यांनी आपल्या काव्य लेखनातून पाणी समस्या अतिशय प्रभावी अशी वर्णन केली आहे. आज पाण्याचे दुर्भीक्ष आपल्या सर्वांना जाणवत असते, अशोक कोतवाल यांच्या पहिला शब्द पाणी या कवितेत ते सांगतात

*कुठूनही येतो हा शब्द पाणी*
*बायकांच्या बोलण्यातून*
*मुलांच्या गोंगाटातून*
*पक्षांच्या किलबिलाटातून*
*गुरांच्या हंबरण्यातून*
*इतकच काय*
*झाडावरून गळून पडणार पान ही*
*हा शब्दच होतो पाणी*

या कवितेतून कवीने पाण्याची समस्या अतिशय प्रभावी अशी दार्खवली आहे. पाणी हा शब्द स्त्रीया व लहानमूले ,पक्षी तसेच गुराचे हंबरण्यातून तसेच झाडावरुन पडणारे पान देखील पाणी शब्द उच्चारत असते अशा प्रकारे पाण्यामुळे पशु, पक्षी व मानव यांच्या जीवनावर होणा-या परिणामाचे अतिशय सुरेख असे वर्णन अशोक कोतवाल आपल्या लेखनातून करत असतात.

पाण्याच्या कमतरतेचा प्रभाव हा जसा सर्वांना होतो तसाच तो शाळेत जाणा-या विद्यार्थ्यांनाही होत असतो म्हणून पाण्याचे दिवस या कवितेत कवी सांगतात,

*कामाच्या शोधार्थ रोज बाहेर पडणारे पालक*
*फारच गिचमिडया अक्षरात*
*शिक्षकांकडे विनंती अर्ज पाठवतात,*
*मुलाला पाण्यासाठी घरी ठेवल होत सर*
*तरी त्याला शाळेत बसू दयावे*

या कवितेत जागतिकीकरणाचे वर्णन करतांना कवींनी सांगितले की आज पाणी समस्या ही अत्यंत महत्वाची झाली आहे. त्याचा परिणाम हा सर्वांना होतो. त्यामुळेच वडिल हे कमी शिकले आहेत त्यांना आपल्या मुलाच्या शाळे पेक्षा पाणी महत्वाचे वाटते. म्हणून वडिल मुलाला घरी ठेवतात. व त्याला शिक्षक वर्गात बसु देणार नाहीत म्हणून ते आपल्या आहे त्या अक्षरात शिक्षकांना पत्र लिहतात. व त्याला पाण्यासाठी घरी ठेवावे लागले हे सांगतात. यातून जागतिकीकरणाने सर्वांवर परिणाम कसा झाला हेवास्तव कवीने मांडले आहे.

जागतिकीकरणाने समाजात अमुलाग्र असा बदल घडवला आहे. त्यामुळे माणसामध्ये दरी निर्माण झाली आहे. माणूस हा माणसाचे अस्तीत्व विसरत चालला आहे. अशा जागतिकीकरणाचा परिणाम सहन करणाऱ्या समाजाचे वर्णन आपल्या लेखनातून अशोक कोतवाल यांनी अतिशय प्रभावी असे केले आहे.आज मोबाईल ही माणसाची आवश्यक गरज झाली आहे. त्यांचा अतिवापर हा होतांना दिसून येतो. मोबाईलमुळे माणसं जवळ येण्याऐवजी दूर जात आहे. याचे वर्णन मोबाईल कवितेत करतांना कवी सांगतात,

*आता बोलण्याचही*
*भराव लागतं बिल माणसांना*
*म्हणून बोलत नाही माणसं*
*फार वेळ माणसांशी*

UGC Journal List No.64768, Impact Factor 4.270 Vol - 08, Special Issue - 10, March 2018, ISSN-2230-9578

*असेल भेटायचं चुकून*
*परस्परांना कुठेतरी*
*तर देतात मिसकॉल ते आठवणींचा*

या कवितेतून माणस माणसां पासून कशी लांब जात आहेत. आजच्या मोबाईलच्या युगात माणसाला बोलायलाही पैसे भरावे लागतात. म्हणून माणस आता मिसकॉल संस्कृतीचा वापर करत आहेत. यातून कवीने समाजात होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या बदलाने माणसाचे माणूसपण कसे हिरावून घेतले याचे वर्णन केले आहे.

आजची पिढी ही मोबाईलची वेडी झाली आहे. त्यांचा भरपूर वेळ हा मोबाईल वर जात असतो. म्हणून कवी सांगतात की, आजच्या या पिढीला जणू मोबेलिया आजार झाला आहे. म्हणून अशोक कोतवाल सांगतात,

*ज्याचे मला सारखे भास होतात*
*अन माझी नजर असते*
*ज्यावर सतत स्थिरावलेली*
*तो मोबाईल आहे एक निर्जीव यंत्र*
*हेच विसरत चाललोय मी*
*अंघोळीला बसल्यावर*
*नळाची तोटी सुरु केली म्हणजे*
*मला भास होतो*
*बाहेर मोबाईल वाजत असल्याचा*
*बाईक चालवतांनाही*
*मी मध्येच बाईक थांबवतो*
*अन पाहून घेतो खिशाला हात लाऊन*
*मोबाईल तर थरथरत नाहीयेना आत*

जागतिकीकरणाने माणसाची प्रगती झाली. अनेक नवीन साधने माणसाच्या हाती आलीत. त्यापैकीच मोबाईल हे एक आहे. पण मोबाईलचा वापर हा गरजे पुरता न करता माणसाने त्याचा अतिवापर केला त्यामुळे अशा माणसांना मोबेलिया नावाचा आजार झाला असावा असे कवीला वाटते. म्हणून मोबाईलचा अतिवापर करत असतांना माणूस हे विसरतो की, मोबाईल हा निर्जीव आहे. पण माणसाला आज असे वाटते की निर्जीव असणारा मोबाईल हा आज सजीव माणसासारखा झाला आहे. जी माणसं मोबाईलचा अतिवापर करतात त्यांना नेहमी आपल्याला फोन आला असेल असा भास होतो. कोणतेही काम करत असतांना त्यांना तो भास होतो. अंघोळ करतांना मोबाईलचा आवाज होतो असे वाटते. तसेच काही वेळा गाडी चालवतांना देखील माणसं गाडी थांबवून आपल्याला फोन आला आहे का हे पुन्हा पुन्हा बघत असतात.

जागतिकीकरणाने पूर्वीची मातीची घरे आज हद्दपार झाली आहेत. सर्वत्र आज सिमेंटची जंगले निर्माण होत आहेत. पूर्वी छतावर कावळे चिमण्या बसत पण मात्र पूर्वीची घरे राहिली नाहीत त्यामुळे त्यांना बसायाला जागा देखील नाही. तसेच पूर्वी घरात चिमण्या आपले घर बनवत पण आज सिमेंटच्या घरात चिमणी आपले घर बनवत नाही याची खंत अशोक कोतवाल यांनी डोलारा वैचारिकतेचा या कवितेत वर्णन केली आहे.

थोडक्यात अशोक कोतवाल यांनी आपल्या नुसताच गलबला या काव्य संग्रहातून समाजाच्या बदलत्या जाणिवाचे दर्शन घडवले आहे. त्यांनी यातून वर्णन केलेली चित्रणे ही आजच्या समाजाचे अतिशय प्रभावी असे दर्शन घडवतात व जागतिकीकरणाने समाजात झालेला बदल कवी आपल्या शब्दातून मांडत असतो. तसेच अशोक कोतवाल यांनी आपल्या आजूबाजूच्या समाजाचे वास्तव व खरे वर्णन यातून केले आहे हे विषेश.

### संदर्भ


१. बागुल फुला-खानदेशातील समकालीन कविता : एक आस्वाद-प्रशांत पब्लिकेशन,जळगाव, प्रथमावृत्ती, १४ जानेवारी २०१४

२. कोतवाल अशोक-नुसताच गलबला-पदमगंधा प्रकाशन,पुणे, फेब्रुवारी-२०१७


Scanned with OKEN Scanner

Journal of Research & Development
Vol. 08 (Special Issue 04) January 2018, (ISSN-2230-9578)
UGC Journal List No. 64768, COSMOS IMPACT FACTOR- 4.270

24

# 'गराडा' कादंबरीतील बदलत्या कृषी जीवनाचे स्वरुप

प्रा. डॉ. किशोर आर पाठक, मराठी विभाग प्रमुख, पंकज कला महाविद्यालय,चोपडा, जि. जळगाव

साहित्य हे समाजाचा आरसा असते. समाजात घडणा-या घटनांचे वर्णन त्यातून केले जाते. त्यामूळे समाजात होणारा प्रत्येक बदल साहित्यिक हे आपल्या लेखणीने साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न करत असतात. त्याचा प्रत्यय सर्वच साहित्य प्रकारातून येत असतो. असे असले तरी कादंबरी व समाज यांचा जवळचा संबंध आहे. कादंबरीकार हा समाजात राहतो व समाजात जाणवणा-या प्रत्येक समस्या तो विविध पात्रांच्या माध्यमातून वर्णन करत असतो. आज ग्रामीण कादंबरीत खुप मोठया प्रमाणात लेखन झाले आहे. त्यातून ग्रामजीवन, शेती, शेतीसमस्या यांचे चित्रण आले आहे. अशा साहित्यातून ग्रामीण जीवनाचे वास्तव असे स्वरुप समजण्यास मदत होत असते. अशा कादंबरी विषयी प्रा. डॉ तानाजी राऊ पाटील लिहतात, "मराठी कादंबरी अधिकाधिक समाजाभिमुख होत आहे. महाराष्ट्रातील खेडयापाडयातील माणसाचे जीवन तिच्यातून व्यक्त होत आहे. महाराष्ट्राचे सामाजिक,सास्कृतिक आणि राजकीय जीवनाचे सम्यक चित्रण आज मराठी कादंबरीत घडत आहे. " यातून कादंबरी ही समाजाचे वास्तव असे चित्रण करुन समाजातील विविध समस्या व समाजातील जनजीवनाचे वर्णन करण्यास मराठी कादंबरी ही यशस्वी होत आहे.

'गराडा' ही भिमराव वाघचौरे यांची कादंबरी ती २००२ मध्ये प्रसिध्द झाली. या कादंबरीत बदलत जाणा-या कृषी जीवनाचे वास्तव असे वर्णन आले आहे. कादंबरीच्या सुरवातीलाच,

'शेतमालाच्या संदर्भात ज्यांनी
छातीवर गोळया झेलल्या त्यांना आणि
अशा गराडयात सापडल्याने
ज्यांनी स्वतःच संपविल
त्या शेकडो शेकरी बांधवांच्या
तडफत्या आत्मयांना'

अशी कादंबरीची सुरवात होत असते. 'गराडा'या या कादंबरीतून शेतक-यांची वास्तव अशी स्थिती तसेच शेतीची भयावह अवस्था, बी-बियाणे यावर होणारा भरमसाठ खर्च विविध प्रकारचे फवारे त्यामूळे होणारे परिणाम या सोबत सर्वात महत्वाचे म्हणजे नैसगिक आपत्ती, शासनाचे शेतक-या बाबतचे उदासिन असे धोरण, शेतक-यांची लूट करणारे व्यापारी, शेतक-यासाठी असलेल्या अनेक शासकीय योजना पण प्रत्यक्षात त्याचा शेतक-याना होणारा फायदा अशा अनेक घटनांचे वर्णन कादंबरीकराने केले आहे. शेती व शेतक-यांच्या शोषणाच्या संदर्भातील विविध पातळयावरील चित्रण या कादंबरीत आले आहे. शेतकरी शोषणाचे वर्णन करणारी ही विद्रोही कांदबरी आहे.

कादंबरीच्या सुरवातीला मोंढा मार्केटचे वर्णन येते. या मार्केट मधील एक आडत्या घाडगे आणि कंपनी चा मालक साहेबराव घाडगे फियाट गाडीतून येतो. या नंतर कांदबरीत शेतक-यांच्या विदारकतेचे चित्रण येते.



Scanned with OKEN Scanner

25

साहेबरावला आपल्या जीवनातील मागील घटना आठवते. त्यात साहेबराव हा आपले गाव सोडून निघाला आहे. गाव सोडतांना त्यांची पत्नी हिराला आपली पूर्वीची परिस्थिती आठवत असते. तेव्हा साहेबरावला आठवते की, " असा समदा बैल बारदाणा हयाच मळ्यात आप्पांन जपला जोपासला होता. सुखासमाधानात नांदत गोकुळ यांनाच्या डोळ्यांन पहायला अनभवल होत.... " आप्पाने भरपूर उत्पादन घेतले घरी गोकुळ नांदत होते. पण आता परिस्थिती बदलली होती, सर्व सामान घेऊन बाहेरगावी जाण्याची वेळ साहेबरावर येते.

कांदबरीत शेतीच्या बदलत जाणा-या स्वरुपाचे वर्णन अनेक ठिकाणी आले आहे. यात वेळेवर पाऊस पडत नाही. एके दिवशी जेव्हा पाऊस पडतो तेव्हा साहेबराव शेतात कापूस लागवण करण्याचे ठरवतो. त्यासाठी त्याने कस्तूरी-१८ या वाणाची निवड केली. शेतात दोन पानांची रोपे दिसू लागतात तेव्हा पाऊस नसल्याने पिक जळायला सुरवात होते. एके दिवशी साहेबराव हा आपल्या शेतात वखरणी करत असतो तेव्हा पिपंळाच्या झाडाच्या मुळीत वखर अडकतो व वखर मुडतो तेव्हा काम बंद होते त्यावेळी साहेबु हा आपल्या बैलाना पाणी पाजण्यासाठी मोटार सुरू करतो तेव्हा त्याला शॉक लागतो. यानंतर त्यांने शेतात वांगे, मिरची व कांदे लागवड केलेली असते ते विकून आलेल्या पैश्यातून घरखर्च निघावा हा त्याचा प्रयत्न असतो. त्यावेळी कांदा जळायला सुरवात होते कारण विज नसल्याने विहरीतून पाणी काढता येत नाही. यावेळी साहेबराव हा खेडयातील विजस्थिती विषयी बोलतो. यानंतर तो काठोळया वायरमनला विजे विषयी बोलतो. आपल्या शेतातील पिक वाचवण्यासाठी तो आपल्यापरीने प्रयत्न करत असतो. पाऊस पडत नाही तेव्हा तो गाडीवरुन पाणी आणून पिकांना पाणी देत असतो. पण अचानक जोराचा पाऊस येतो त्यामूळे रोपांवर माती पसरली जाते. ती माती बाजूला करण्याचा प्रश्न पून्हा साहेबू समोर उभा राहतो. यातून शेतक-यांच्या समस्या या कधीही कमी होत नाहीत एक समस्या दुर होत नाही तो पर्यंत दुसरी समस्या शेतक-यांच्या समोर आवासून उभी राहत असते याचे या कादंबरीत अतिशय जिवंत असे वर्णन कादबरीकारने केले आहे.

सायबूने वायमनशी भांडण केले तेव्हा वायरमन बील वसूल करण्यासाठी अधिका-यांना घेऊन येत असतो. त्यावेळी बीलाचा मोबदला म्हणून दोन पोते गहू देऊन त्याला पाठवले जाते. यानंतर अचानक डिपीवर जाळ होतो त्यात सायबूची मोटार जळते ती मोटार भरण्यासाठी व्याजाने पैसे काढण्याची वेळ त्याच्यावर येते. अशा वेळी त्याला घरातील हरबरा विकावा असे वाटते. सायबूची आई त्याला सांगते की, "कर भऊ कसतरी बसव कसातरी मेळ काय करतो तरी." यावेळी व्यापारी शेतक-यांची लूट कशी करतात याचे वर्णन येते. यातून व्यापर-यांच्या गराडयात शेतकरी सापडत असतो. ही लूट बघीतल्यवर त्याला वाटते की, शेतीचा धंदा हा तोटयाचा आहे. थोडयाक्यात शेतक-यांने कितीही पिकवले तरी सर्व बाजूने त्याची लूट होते हे जाणवते यातच हमाल देखील हरबरा मोजतांना २-३ किलो हरबरा बाजूला काढत असतात. शेवटी आलेल्या पैश्यातून मोटार भरण्यासाठी किती पैसे लागतील यांचा विचार साहेबरावच्या मनात येत असतो.

कांदबरीत शेतकरी हा नेहमी विविध समस्यांच्या गराडयात सापडला आहे, एक समस्या संपत नाही तो पर्यत दुसरी समस्या त्याच्या समोर उभी राहत असते. मोटार सुरु केल्यावर तो शासकिय योजनेतून लावलेल्या चिकूच्या रोपाना पाणी दयायला सुरवात करतो तेव्हा पाणी बाहेर जायला नको म्हणून तो कापडाचा बोळा देतो त्यावेळी कापडाचा बोळा ठिबकच्या फिल्टर मध्ये अडकतो. तो बाहेर काढण्यासाठी देवकर एजंटला बोलवतो पाईपलाईन त्यावेळी फूटते यातून शेतक-यांना समस्येच्या मालिकांना नेहमी सामोरे जावे लागते हे दिसत असते. त्यातच त्याच्या मुलाच्या डोक्याला लागते तेव्हा मुलाला दवाखान्यात त्याला न्यावे लागते. लाईट कट करण्यासाठी वायरमन येतो तेव्हा त्याच्याशी भांडण करुन त्याला परत पाठवले जाते. आप्पा हे बैल चारण्यासाठी नेतात त्यात धिंगाण्या बैलाला गाडीची धडक लागते तेव्हा कामाचा बैल हा अधु होतो आता काय करावे हा प्रश्न सायबू समोर असतो. त्यातच शेतात लागणारा युरीया तो विकत घेतो पण घरी आणतांना तो पावसात भिजत असतो. यात निसर्ग सुध्दा शेतक-याची कशी परीक्षा पाहतो हे दिसत असते. याही परिस्थित तो आपली शेती भावाच्या आर्थिक मदतीने करायला सुरवात करतो. एके दिवशी शेतात फवारणी करतांना तो एक आळी फवा-यात बुडवतो तरी ती मरत नाही तेव्हा त्याला वाटते की, आता औषध देखील डुप्लीकेट येत आहे. त्याचा मामा हा नोकरीला असतो तो सांगतो की, आता शेती करण्याऐवजी शेत विका व आलेला पैसा बँकेत ठेवा पण हे आप्पांना आवडत नाही. पाऊस जास्त पडत नाही तरी सायबूच्या शेतात बाजरीचे पिक चांगले असते उत्पादन भरपूर येईल असे वाटते. पण अचानक धुवा पडतो त्यात पिक वाया जाते झालेला खर्चही निघत नाही. बाजरीवर गहू व हरबरा पेरतो. पण हरब-यावर आळया पडतात

त्याच्या फक्त काडया उरतात. गहू उंदिर खातात. यातूनही जो गहू येतो विकतांना व्यापारी त्याला भाव देत नाही यात शेतक-याला सर्व बाजूनी अडचणीचा सामना कसा करावा लागतो हे लक्षात येते.

दोन पैसे हातात यावेत म्हणून तो कांदा लावतो पण कांद्याला भाव नाही म्हणून हैद्राबादला नेतो त्यावेळी खर्च जास्त होतां आलेले पैसे घेऊन तो रात्री घरी परत जात असतांना त्याच्यावर हल्ला होतो. यात सर्व वेळी शेतकरी कसा लूबाडला जातो याचे वर्णन येते. यानंतर चिकूच्या रोपांना तो उन्हाळयात पाणी देतो तेव्हा खारी सर्व नळया कुरतडतात. तेव्हा बांधावरचे झाड तो तोडतो त्याचा जाब तलाठी विचारतो त्यावेळी काय करावे असा प्रश्न त्याला पडतो. कापूस विकायला फेडरेशन मध्ये तो नेतो तेथे शेतक-यांचे हाल कसे होतात याचे वर्णन कादंबरीत येते. कादंबरीच्या शेवटी आपला मळा गुर ढोर सर्व विकून तो गाव सोडून निघून जातो. या कादंबरीत कादंबरीकारने शेतकरी समस्यांची मालिकाच उभी केली आहे. कधी शेतक-याच्या मालाला दोन पैसे चांगले मिळत असतात शेतक-याची परिस्थिती त्यामूळे सूधारते याचे वर्णन यात येत नाही. शेतकरी समस्यांचे रडगाणे कादंबरीत नेहमी दिसून येते. आज शेती बदलत आहे नवीन तंत्रज्ञान येत आहे याचे वर्णन कादंबरीत येत नाही. या कादंबरीत शेतक-यांच्या बाबतीत नकारात्मकता जास्त प्रमाणात दिसून येते.

असे असले तरी गराडा कादंबरी ही समस्यांचे वर्णन करतांना महत्वाची भूमिका बजावते ग्रामीण कादंबरी विषयी डॉ. वासूदेव मूलाटे लिहतात, "आज तर ग्रामीण जीवनाच्या विविध अंगा-उपांगाना शब्दबध्द करणा-या ग्रामीण जीवनातील बदलेल्या समाज वास्तवाला साकार करणा-या कादंब-या मराठीत येत आहेत. ग्रामीण जीवन प्रत्यक्ष भोगणारे लेखक आणि वाचक यांचा संवाद घडत आहे. त्यामधून येणारे प्रश्न आणि जाणिवा बदलल्या आहेत. बोलीतून निवेदन करण्यासारखे प्रयोग होत आहेत. ग्रामीण जीपनाचा सूक्ष्मतेने शोध घेण्याचा प्रयत्न होत आहे. एकूणच मराठी कादंबरीचे दालन ग्रामीण कादंबरीने समृध्द होईल अशा दिशेने तिचा विकास होत आहे." अशा प्रकारे भिमराव वाघचौरे यांनी आपल्या गराडा या कादंबरीतून बदलत्या कृषी जीवनाचा अचूक असा वेध घेतला आहे याची जाणीव या तून होत असते.

संदर्भ-

१) पाटील तानाजी, 'मराठी कादंबरी समीक्षा', डायमंड पब्लिकेशन,पूणे, प्रथमावृत्ती, ५ फेब्रुवारी २००९
२) वाघचौरे भिमराव,. 'गराडा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,२००२.
३) मुलाटे वासूदेव, 'ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,डिसेंबर २००५

36

# गिरिराज किशोर की कहानियों में अभिव्यक्त नारी के विविध रूप

प्रा. दिलीप पी. पाटील
पंकज कला महाविद्यालय, चोपडा
जि.जलगांव.

***********

आधुनिक कथा साहित्य बहुआयामी है । कथा साहित्य में प्रेमचंद मील के पत्थर है उन्होंने अपने साहित्य में नारी को सम्मानजनक रूप में प्रस्तुत किया है । प्रेमचंद के साथ ही सुदर्शन, विश्वंभरनाथ शर्मा 'कौशिक' भगवतीप्रसाद वाजपेयी, राधिका रमण प्रसाद सिंह आदि कहानीकारों ने अधिकांशतः चरित्रप्रधान कहानियाँ लिखी । इन कहानीकारों ने नारी जीवन की विविध समस्याओं को उद्घाटित किया है । मनो विश्लषेणात्मक साहित्यकारों ने नारी का मनो विश्लेषणात्मक रूपायन किया है । तो प्रगतिवादी कहानीकारों ने नारी पर होने वाले अन्याय – अत्याचार, जुल्म जबरदस्ती का विरोध प्रकट किया ।

बीसवी शती के छठें दशक में भारतीय समाज में नयी – पुरानी मान्यताओं में संघर्ष उभकर आया । इस दशक में नारी अपने अस्तित्व और अस्मिता के प्रति सजग हुई । उसने पुरानी रूढियों और परम्पराओं के बंधनों का विरोध किया । बीसकी शती के छठे दशक के बाद वैचारिक परिवर्तन आया ।वैचारिक परिवर्तन के कारण उसमें सजगता आयी । नारी पुरातन और नयें रूपों में सामने आयी ' स्वतंत्रता का संघर्ष अपने घर से ही शुरू किया ।

साठोत्तरी हिंदी कहानियों में नारी विविध रूपों मे सामने आयी । माँ, बहन, पत्नी, प्रेमिका, बेटी विधवा, वेश्या, कामकाजी, परित्यक्त्या, नौकरी करनेवाली आदि रूपों में चित्रित की गई । स्वतंत्रता के बाद नारी मान – मूल्यों में परिवर्तन आया । नारी को पुरूष के समकक्ष माना गया । शिक्षा तथा नारी जागरण के कारण नारी निर्भीक हुई । आज नारियाँ संघटित होकर उनपर होनेवाले अन्याय – अत्याचार का विरोध करती दिखाई देती है । सरोज चौबे के शब्दों में "औरत अबला है, शक्ती है, औरत भोग्या है, औरत भक्ती है, औरत सुदंर है, और औरत विषकन्या, औरत ही स्वार्थ है, औरत ही त्याग, सृष्टी और सर्वनाश है ।"

गिरिराज किशोर के कहानियों में नारी विविध आयामों अभिव्यक्त हुई है । नारी के अनेक रूपों का अंकन हुआ है ।

**माँ का रूप:–** गिरिराज किशोर की कहानियों में माँ का रूप स्पष्ट चित्रित हुआ है । परिवार में माँ का अतत्य साधारण महत्व होता है । माँ का स्थान परिवार में ऊचा होता है । माँ सबको साथलिए काम करती है । वह ममता की भावना तथा वात्सल्य की सहज स्वाभाविक और प्राकृतिक स्त्रोत होती है । वह ममस्व को तोड नहीं सकती । पर्ते, कठपुतली, अन्तहीन राहें, चुहें, शीर्षकहीन, वल्दरोजी, वे नहीं आये, प्रेमपत्र, यह देह किसकी है ? गाउन, रिश्ता, जमीन का टूकडा, आदि कहानियों में माँ का रूप स्पष्टतया चित्रित है ।

**बेटी का रूप :–** लेखक किशोर जी ने अपनी कहानियों में पारिवारिक स्तर पर बेटी को भी स्थान दिया हैं । परिवार में बेटी का स्थान दुय्यम दर्जे का रहा है । कुलवंश के लिए सबको लडका महत्वपुर्ण लगता है परंतु लडकी के बिना घर का अंगन सूना होता है । बेटी है तो संसार है । माता – पिता के लिए बेटी – बेटा में व्यवहार को लेकर भी दुविधा है । कोई माता – पिता भले ही समानता की बातें करते होंगे लेकिन व्यावहारिक तौर पर वे भी अछूते नही है । इन सब बातों का अंकन गिरिराज किशोर की कहानियों में हुआ है । जैसे – गुलाबजामुन खारट, गाउन, तमोली सब पर हावी है, वह थी एक फारव्ता, चूहे, खंडहर, अल्ला ईश्वर तेरे नाम आदि कहनियाँ इसका दस्तावेज है ।

**बहन का रूप :–** गिरिराज किशोर की कहानियों मे बहन का रूप भी यत्र – तत्र चित्रित



Scanned with OKEN Scanner

हुआ है। भाई बहन का रिश्ता इन दोनों के अलावा अधुरा है । साथ ही परिवार में इस रिश्ते को लेकर पवित्रता हैं । इन दोनों मे प्रेमभाव होता है। कभी बुरे विचारों को लेकर यह रिश्ता तैयार नही होता बल्कि इसमें नि:स्वार्थ विचार होते है । आज बहन – भाई के संबंध को नाम मात्र और सामाजिक सुरक्षा के लिए उपयोग में लाया जा रहा है । रक्त के संबंध में भाई – बहन को पवित्र मान लिया जाता हैं,जब की रक्त के अन्य संबंधों में पवित्रता खत्म होते जा रही है । उनके रिश्तों मे दरारे उत्पन्न होने लगी है । उनकी पवित्रता समाप्त होती जा रही है । एक धागा दोस्ती का तथा बहन – भाई का बांध लेने से रिश्ता पक्का नहीं हो जाता । यही मानसिकता का चित्र सर्वत्र दिखाई दे रहा हैं । अखबार भी इसका बखान करता है । कल और आज की मानसिक विचारधारा का चित्र गिरिराज किशोर की कहानियों में व्यक्त हुआ है । उसमें खंडहर, अल्ला ईश्वर तेरे नाम, कलमें, कांटे और फुल, पीली पत्तियाँ नीम की, निकरवाला साईस, गाउन, ईश्वर को यही मंजुर था ।

**पत्नी का रूप** :— भारतीय संस्कृती महान है। उसमें पती – पत्नी का रिश्ता बेजोड है । पत्नी का पती के प्रति एक निष्ठ रहना उसका परम धर्म है। पती – पत्नी की जोडी निष्ठा और विश्वास के ऊपर चलती है । लेकिन इन दिनो इस धारणा मे बदलाव आया है । अत्याधुनातन तथा पाश्चमात्य अंधानुकरण विचारधारा की वजह से तथा परिस्थितिवश नारी का पती के प्रति निष्ठावान रहना संभव नही रहा है । अत: पत्नी पती के प्रति अनिष्ठावान वर्तन कर रही है। पत्नी के वर्तन में बदलाव के कारण संबंध बिगड रहे है। गिरिराज किशोर के कथनियों में पत्नी के उक्त दोनो रूप अभिव्यक्त हुए है – उसमें पर्ते, छ: शीशे दो आकार, बात कौडी की, कठपुतली, प्रत्यावर्तन, बच्चोसे कौन डरता है । किसान, देहातिक्रमण, पामेला, हत्या, पीली पतियाँ नीम की,सिपाही का सत्कार ,अन्नहीन राहें, हँसी के पार, केस, परछाइयाँ, गाउन, नायक, रिश्ता।

**सास – बहु का रूप** :— परिवार तथा समाज में इस रिश्ते को लेकर बडी चर्चा होती है क्योंकि यह रिश्ता सीधा नही होती । इसमें मनमुटाव अधिक होता है । अपवादात्मक स्थिति में एकाध जगह यह रिश्ता माँ – बेटी के जैसा होता है । सास – बहु का स्नेहपुर्ण संम्बध परिवार में सुख, शांति एवं समाधान के लिए सहायक सिध्द होता हे । परंतु सास बहु के सम्बन्ध परस्पर स्नेहमय नही होते । फलत : सास बहु में व्देष, मत्सर, घृणा की भावना होती है । एक दुसरे के ऊपर ताने कसना । सास के व्दारा बहु को खरी – खोटी सुनाना यह नित्य का बन जाता है। अत: गिरिराज किशोर की अधिकांश कहानियों में उक्त स्थिति दृष्टीगोचर होती है । सास के रूप का अंकन इन कहानियों मे हुआ है – प्रत्यावर्तन वे नही आये, पीली पतियाँ नीम की । इसी प्रकार बहु के रूप का चित्रण विलायती कुत्ता, प्रत्यावर्तन, वे नही आये में हुआ है ।

**शिक्षित और अशिक्षित नारी** :— आलोच्य लेखक के कहानियों में अधिकांश नारीयाँ शिक्षित है । उनमें कुछक तो उच्च विद्याविभूषित भी है । वे शिक्षा – क्षेत्र में अध्यापक, अधिव्याख्याता, प्रिंसीपल तथा विविध कार्यालयों में अफसर के रूप में कार्यरत है । कुछ नारियाँ वैदयकक्षेत्र से भी जुडी है । पिली पतियाँ नीम की और बिसात कहानियों मे नारी अध्यापिका के रूप में चित्रित है । तो तार व्दारा वापसी, पर्ते, केस, टेडी मेढी सतरें कहानियों में अधिव्याख्याता के रूप में अध्यापन करनेवाले नारियों के चित्र विद्यमान है । डॉक्टर के रूप मे काँटे और फुल, मवेशी, वे नहीं आये आदि कहानियों मे चित्रित है । अशिक्षित नारी का अंकन भी आलोच्च लेखक की कहानियों मे मिलता है। वीरगति, चेहरे, गुलाब जामुन खाइए, वे नही आए, जमीन का टुकडा, गाडी आई गाडी गई, पर्ते, कठपुतली, चूहे, मवेशी आदि कहानियाँ इसका दस्तावेज है ।

**प्रेमिका का रूप** :— मनुष्य प्रेम, श्रध्दा, करूणा, दया, क्षमा, शांति, भक्ति, स्नेह, वात्सल्य, सौहार्द आदि वृतियाँ समाहित होती है । उसमें प्रेम सर्वश्रुत है । प्रेम में प्रेमिका – प्रेमी परस्पर गुण दोषों के साथ एक – दुसरे को स्वीकार करते है । युवा अवस्था में ही इसका आकर्षण एक दुसरे के प्रति



Scanned with OKEN Scanner

बढता है । अन्य शब्दों में कहें तो नर – नारी की ओर और नारी – नर की ओर आकर्षित होती है । यह आकर्षण परिस्थितीवश तथा मानसिक भी हो सकता है । अत:गिरिराज किशोर की कहानियों में प्रेम का अंकन है । साथ ही प्रेम त्रिकोण को भी अभिव्यक्ति दी गई है । इसमें एक नारी दो पुरूष तथा दो नारी एक पुरूष समाहित होते है । उसमें छ : शीशे दो आकार, कलमें, कॉटे और पुल, और मै था, अन्तहीन राहें, हँसी के पार, अब मै वापस आ सकता हूँ आदि कहानियों मे इसका चित्रण हुआ है ।

**कामकाजी नारी का रूप :–** कामकाजी नारी का तात्पर्य है कि वह घर से बाहर किसी दुसरे के घर अथवा कार्यालय में जाकर काम करें और अर्थार्जन करें ताकि परिवार को उतनी सहायता मिले। आधुनिक शिक्षा के कारण नारी आज अपने पैसे के ऊपर खडी होना चाहती है । उसकी जिम्मेदारियों भी बढ गई है । नारी घर – परिवार के साथ बच्चो को संभालते हुए वह नौकरी भी कर रही है । इतनी कसरत से अपना गुजारा वह कर रही है । कामकाजी नारी घर की अर्थव्यवस्था को मजबूत कर रही है । उनकी अपेक्षा होती है कि पति परिवार के अन्य लोक उसकी स्थिति गति को भली–भॉति समझे और सहायता करे किंतु होता कुछ और है। घर के लोंगों का व्यवहार उसके संग ऐहसान जताने का होता है । उसका अपेक्षाभंग होता है। कामकाजी नारी शारीरिक एवं मानसिक स्तर पर थके रहने के बावजूद उसे भावनात्मक स्तर पर शांति नहीं मिलती । वह जो कमाती उसका कमाया हुआ धन उसके मन के विरूध्द खर्च किया जाता है । एक तो वह नोकरी छोडना चाहती है लेकिन छोड नहीं सकती । अन्तरिक मन से विवश है। एक ओर घर की आवश्यकताओं के कारण मजबूर है। दुसरी ओर शिक्षा – दीक्षा तथा ज्ञान का कही तो उपयोग हो इसके लिए विवश है । 'तार व्दारा वापसी' कहानी की नायिका नीता इसका प्रमाण है । कठपुतली की रीता और नोकरानी दोनो कामकाजी नारियॉं है । पर्ते, कलमें, कॉटे और फुल, असमंजस, पीली पतियॉं नीम की, बंगलेवाले नही दुश्मन, किसान, केस, मवेशी कहानियों मे कामकाज करनेवाली नारीयों का उल्लेख है।

गिरिराज किशोर हिन्दी साहित्य के मेधावी साहित्यकार है । उनकी कहानियों में नारी के विविध रूप मौजूद है । उसमें नारी का मन, अनुभव, भुख, तृप्ति, सेक्स, कुंठाएं निहित है। नारी के शिक्षित समुदाय ने अपने अस्मिता के आधार पर कुछ करने की चाहत रखी लेकीन पुरूष प्रधान संस्कृति से प्रताडित हुई । नारी अपने स्वत्व को लेकर जीना चाहती है । उसे अपने अस्तित्व की खोज है । समाज व्दारा किये जा रहे एकतरफा व्यवहार से वह दुखी है । सच्चे न्याय के लिए वह आज भी प्रतिक्षा में है उनकें अंदर की घूटन उसको बेचैन करती है । आज की नारी के विविध रूपों को गिरिराज किशोर ने चल रहे कसमकस को समझा और वाणी देने का प्रयास किया है ।

**संदर्भ ग्रंथ :–**


१) गिरिराज किशोर का कथा – साहित्य :– डॉ.आरती वर्मा

२) संवा. सरोच चौबे, आधी जमीन (विशेषांक) अक्तुबर – दिसंबर – २००१

३) साठोत्तरी हिन्दी कहानियों मे नारी – डॉ.पुष्पा गायकवाड

४) कथाकार गिरिराज किशोर :– डॉ. सदावर्ते


❑❑❑



